# <u>जाहिर नोटीस(१)</u>

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेली पिंपरीचिंचवडमहानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितियांनी पिंपरीचिंचवडमहानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरीचिंचवडमहानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरीचिंचवडमहानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

<u>परिशिष्ट –१</u>

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे येथील ,पोट तुकडी हवेली ,पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स .नं.१०८/३/२/ई मधील श्री. जितेंद्र बाळासाहेब यादव यांच्या मालकीच्या मिळकतीतील नवीन हद्दीच्या क्षेमध्ये समाविष्ट करणेत आलेल्या क्षेत्रातील मंजुर विकास योजनेतील ३०.०० मी रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र २७५.०० चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

उत्तेरस. - लागू ताथवडेची शीव

दक्षिणेस - लागू स.नं. १०९ पैकीची मिळकत

पूर्वेस - लागू स.नं. १०९ पैकीची मिळकत

पश्चिमेस – लागू रस्ता

जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खलीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कोणत्याही वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रावेत येथील स नं ४४/२ पै मधील मे. विजगेन टेक्नॉलॉजीस तर्फे पार्टनर्स श्री राजकुमार लक्ष्मण कोंडे व सौ. स्वाती राजकुमार कोंडे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील २४.०० मी रस्ता या प्रस्तावाने बाधीत होणारे क्षेत्र १४६.०९ चौ.मी. मधील जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स नं ४४/२ पै

२४.०० मी रस्ता चतु:सिमा : ( एकुण बाधित क्षेत्र १४६.०९ चौ.मी )

उत्तरेस :- स. नं. ४४ पै मिळकत

पुर्वेस :- लागू रस्ता

दक्षिणेस :- स. नं. ४४ पै अर्जदाराची उर्वरित मिळकत

पश्चिमेस :- स. नं. ४४ पै मिळकत

परिशिष्ट २) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रावेत येथील स नं ९३/३/३ पै मधील श्री गोरख मधुकर भालेकर, श्री नाथा विठ्ठल शिंदे, श्री राजेश गुलाब काळभोर व श्रीम राजश्री ज्ञानेश्वर काळभोर यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रस्ता या प्रस्तावाने बाधीत होणारे असे एकुण क्षेत्र ३०६.०० चौ.मी. मधील जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स नं ९३/३/३ पै

२४ मी रस्ता बाधीत क्षेत्राच्या चतु:सिमा : ( एकुण बाधित क्षेत्र ३०६.०० चौ.मी )

उत्तरेस :- लागू रस्ता

पुर्वेस :- लागु रस्ता

दक्षिणेस :- लागू रस्ता
पश्चिमेस :- स. नं. ९३ पै उर्वरित मिळकत

परिशिष्ट ३) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे च-होली येथील स नं १९३/१ पै मधील श्री मे. कल्पतरू रियॅल्टी प्रा.लि. तर्फे संचालक श्री. सुनिल आर इसरानी यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आ.क्र. २/९२ माध्य.शाळा या प्रस्तावाने बाधीत क्षेत्र १०७६.७५ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे च-होली येथील स नं १९३/१ पै मधील मंजूर विकास योजनेतील आ.क्र. २/९२ माध्य. शाळाने बाधीत क्षेत्र १०७६.७५ चौ. मी

चतु:सिमा :

उत्तरेस :- स.नं. १९३ पैकी
दक्षिणेस :- स.नं. १९३ पैकी
पुर्वेस :- स.नं. १९३ पैकी
पश्चिमेस :- स.नं. २२१ पैकी

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक १६४
दिनांक ६/८/१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.